**प्रेस नोट** **ता.०८/०३/२०१९**

## लष्कर पोलीस स्टेशन

## सन २०११ पासुन फरार असलेल्या आरोपीस अटक

पोलीस ठाणे स्तरावरील पाहीजे फरारी आरोपी चेक करणे व त्यांना अटक करणे कामी मा.पोलीस उप आयुक्त सो,परिमंडळ-२ पुणे शहर यांचे आदेशान्वये पथके निर्माण केली असुन सदर पथकात काम करणारे पोहवा/३१२५ शितोळे हे पाहीजे आरोपी चेक करीत असताना त्यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की लष्कर पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नंबर १८२/२०११ भादवि कलम ३०७,१४३,१४७,१४८,१४९,५०४ मधील पाहीजे आरोपी नामे शफिक रफिक शेख हा नानापेठ, पुणे येथे गॅरेजचे दुकानात काम करीत आहे.सदर बातमीच्या अनुषंगाने नमुद ठिकाणी स्टाफसह जाऊन खात्री करुन शफिक रफिक शेख यास ताब्यात घेऊन त्यास अटकेची कारणे व उददेश समजावुन सांगुन मा.सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शक तत्वाचे तंतोतत पालन करुन दि.०७/०३/२०१९ रोजी २२.००वा दाखल गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे.सदर आरोपी हा गुन्हा घडल्यानंतर सन २०११ पासुन फरार होता,त्याचेबाबत बातमीदारामार्फत बातमी काढुन मोठ्या शिताफिने सापळाला लावून अटक करण्यात आलेली आहे.

सदरची कामगीरी ही मा.पोलीस उप आयुक्त श्री बच्चन सिंग सो, परि.२ पुणे व मा.सहा.पोलीस आयुक्त डॉ.प्रीती टिपरे मॅडम लष्कर विभाग, पुणे यांचे मार्गदर्शना खाली व वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री चंद्रकांत भोसले सो, व पोलीस निरीक्षक गुन्हे श्रीमती माया देवरे यांचे नेतृत्वाखाली पोलीस उप निरीक्षक श्री प्रसाद गज्जेवार तपास पथकातील कर्मचारी पोहवा ५८२६ थिकोळे, पोहवा ३१२५ शितोळे, पोशि ९८१८ हुवाळे, पोशि ९८१५ भोसले यांनी केली आहे.

